# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक १४/११/२०२२

---

## कार्यवृत्त

आज दिनांक १४/११/२०२२ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम विभाग, विधी विभाग, अस्थापना विभाग, शिक्षण विभाग आणि आरोग्य विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

| | |
|---|---|
| विषय क्र.१ | :- गुरुद्वारा जवळ इदगाहकडे जाणाऱ्या रस्त्यावर नालीचे बांधकाम करून त्यावर ढापे टाकणे बाबत. |
| विषय क्र.२ | :- प्रभाग क्र ४ मध्ये निळे यांचे घरापासून ते भोपळे यांचे घरापर्यंत अंडर ग्राउंड नाली बांधकाम करणे |
| विषय क्र.३ | :- प्रभाग क्र ४ मध्ये जंगले यांचे घरापासून ते शर्मा यांचे घरापर्यंत नाली बांधकाम करणे |
| विषय क्र.४ | :- स्मशानभूमी रोड भीमनगर कडे जाणार्या रस्त्याच्या बाजूकडील चौकाचे सौंदर्यीकरण करणे बाबत |
| विषय क्र.५ | :- वैशिठ्यपूर्ण योजने अंतर्गत आठवडी बाजार विकसित करणे बाबत |
| विषय क्र.६ | :- न.प. मलकापूरचे विविध मा. न्यायालयात चालू असलेल्या याचीकांसंबंधी वकिलाचे देयक अदा करण्यास मान्यता देणेबाबत |
| विषय क्र.७ | :- जिल्हा प्रशासन अधिकारी यांच्या पदोन्नतीच्या आदेशा नुसार केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे बाबत |
| विषय क्र.८ | :- आतीया तबस्सुन महंमद अनिस (शिक्षण सेवक) यांना नियमित शिक्षकाची नियुक्ती देणेबाबत |
| विषय क्र. ९ | :- सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतूकीचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ नोव्हेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणे बाबत. |
| विषय क्र. १० | :- सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा प्रक्रियेचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ नोव्हेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणे बाबत. |

---

विषय क्र १ :- गुरुद्वारा जवळ इदगाहकडे जाणाऱ्या रस्त्यावर नालीचे बांधकाम करून त्यावर ढापे टाकणे बाबत.



Scanned by Scanner Go

गुरुद्वारा जवळ इदगाहकडे जाणाऱ्या रस्त्यावर नालीचे बांधकाम करून त्यावर ढापे टाकणे बाबत नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मा. मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, सालीपुरा विष्णूनगर येथील गुरुद्वारा जवळ इदगाहकडे जाणाऱ्या रस्त्यावर नालीचे बांधकाम करून त्यावर ढापे टाकणे गरजेचे असल्याचे नगर अभियंता यांच्या सर्वेक्षणात निदर्शनास आले व तसा अहवाल त्यांनी सदर केलेला आहे. त्यानुसार सदर ठिकाणी कच्ची नाली असल्या कारणाने घाण पाणी रस्त्यावर साचत असून दुर्गंधी होत असल्याने रहिवाश्यांना रहदारीस त्रास होत असून सदर बाबतीत रहिवाश्यांच्या तोंडी तक्रारी देखील प्राप्त होत आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी नालीचे बांधकाम करणे व त्यावर ढापे टाकणे अत्यंत आवश्यक असल्याचे नगर अभियंता यांनी अहवालात नमूद केलेले आहे. त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता गुरुद्वारा जवळ इदगाहकडे जाणाऱ्या रस्त्यावर नालीचे बांधकाम करून त्यावर ढापे टाकण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. फंडातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र २ :- प्रभाग क्र ४ मध्ये निळे यांचे घरापासून ते भोपळे यांचे घरापर्यंत अंडर ग्राउंड नाली बांधकाम करणे**

प्रभाग क्र ४ मध्ये निळे यांचे घरापासून ते भोपळे यांचे घरापर्यंत अंडर ग्राउंड नाली बांधकाम करणे बाबत नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मा. मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, न.प. हद्दीतील प्रभाग क्र ४ मध्ये निळे यांचे घरापासून ते भोपळे यांचे घरापर्यंत अंडर ग्राउंड नाली बांधकाम करणे गरजेचे असल्याचे नगर अभियंता यांच्या सर्वेक्षणात निदर्शनास आले व तसा अहवाल त्यांनी सदर केलेला आहे. त्यानुसार सदर ठिकाणी नागरिकांच्या रहिवासाच्या दृष्टीने रस्त्यांचे व नाल्यांचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असून सदर बाबतीत नागरिकांच्या लेखी व तोंडी तक्रारी प्राप्त होत असल्याचे नगर अभियंता यांनी अहवालात नमूद केले आहे. त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.



Scanned by Scanner Go

वरील सर्वबाबींचा विचार करता प्रभाग क्र ४ मध्ये निळे यांचे घरापासून ते भोपळे यांचे घरापर्यंत अंडर ग्राउंड नाली बांधकाम करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. फंडातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र ३ :- प्रभाग क्र ४ मध्ये जंगले यांचे घरापासून ते शर्मा यांचे घरापर्यंत नाली बांधकाम करणे**

प्रभाग क्र ४ मध्ये जंगले यांचे घरापासून ते शर्मा यांचे घरापर्यंत नाली बांधकाम करणे बाबत नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मा. मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, न.प. हद्दीतील प्रभाग क्र ४ मध्ये जंगले यांचे घरापासून ते शर्मा यांचे घरापर्यंत नाली बांधकाम करणे गरजेचे असल्याचे नगर अभियंता यांच्या सर्वेक्षणात निदर्शनास आले व तसा अहवाल त्यांनी सदर केलेला आहे. त्यानुसार सदर ठिकाणी नागरिकांच्या रहिवासाच्या दृष्टीने रस्त्यांचे व नाल्यांचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असून सदर बाबतीत नागरिकांच्या लेखी व तोंडी तक्रारी प्राप्त होत असल्याचे नगर अभियंता यांनी अहवालात नमूद केले आहे. त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता प्रभाग क्र ४ मध्ये जंगले यांचे घरापासून ते शर्मा यांचे घरापर्यंत नाली बांधकाम करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. फंडातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.४ :- स्मशानभूमी रोड भीमनगर कडे जाणार्या रस्त्याच्या बाजूकडील चौकाचे सौंदर्यीकरण करणे बाबत**

स्मशानभूमी रोड भीमनगर कडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूकडील चौकाचे सौंदर्यीकरण करणे बाबत नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मा. मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, स्मशानभूमी रोड भीमनगर कडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूकडील चौकाचे सौंदर्यीकरण करणे असल्याचे नगर अभियंता यांच्या सर्वेक्षणात निदर्शनास आले व तसा अहवाल त्यांनी सदर केलेला आहे. त्यानुसार सदर ठिकाणी बरीचशी मोकळी जागा असून चारही बाजूकडे जाणारा रस्ता असल्यामुळे या चौकाचे सौंदर्यीकरण केल्यास शहराच्या सौंदर्यीकरणात भर



Scanned by Scanner Go

पडेल तसेच त्या खुल्या जागेत अतिक्रमण होणार नाही. तसा अहवाल नगर अभियंता यांनी सादर केलेले आहे. त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता स्मशानभूमी रोड भीमनगर कडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूकडील चौकाचे सौंदर्यीकरण करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. फंडातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.५ :- वैशिठ्यपूर्ण योजने अंतर्गत आठवडी बाजार विकसित करणे बाबत**

वैशिठ्यपूर्ण योजने अंतर्गत आठवडी बाजार विकसित करणे बाबत नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मा. मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, शासन निर्णय क्र. नपावै-२०१९ /प्र क्र ९९/नवि-१६ दि २० ऑगस्ट २०१९ नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई-३२ अन्वये वैशिठ्यपूर्ण योजना सन २०१९-२० साठी नगर परिषदेला आठवडी बाजार विकसित करण्यासाठी २ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून त्याबाबतचे मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांचे निधी वितरण आदेश पत्र क्र नविशा/डे-३/२०१८/CR-२०७ जा क्र १४२२ दि ०४/०९/२०१९ प्राप्त झाले आहे, यामध्ये कार्यान्वयन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग असे नमूद होते परंतु त्यानंतर नगर विकास विभाग शासन शुद्धिपत्र क्र संकीर्ण-२०२०/प्र क्र १ (अ)/नवि-१६ दि २ फेब्रुवारी २०२१ मंत्रालय मुंबई ३२ अन्वये उपरोक्त कामाकरिता कार्यान्वयन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम ऐवजी नगर परिषद असे वाचण्यात यावे असे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे आठवडी बाजारात विकासाच्या दृष्टीने भाजी विक्रेत्यांकारिता ओटे, शॉपिंग कॉम्प्लेक्स, रस्ते, नाल्या व इतर सोई सुविधायुक्त विकास कामे करावयाची असल्याचे नगर अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालात नमूद केलेले आहे. त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता वैशिष्ठ्यपूर्ण योजने अंतर्गत आठवडी बाजार विकसित करण्याच्या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.६ :- न.प. मलकापूरचे विविध मा. न्यायालयात चालू असलेल्या याचीकांसंबंधी वकिलाचे देयक अदा करण्यास मान्यता देणेबाबत**



Scanned by Scanner Go

वरील विषयाची अतिरिक्त प्रभारी विधी विभाग न.प. मलकापूर यांच्या विषयावरील मा. मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते कि, मलकापूर नगर परिषदेच्या विविध न्यायालयात चालू असलेल्या याचिकांचे जसे नागपूर, बुलढाणा, मलकापूर, अकोला, इत्यादी न्यायालयात दाखल असलेल्या प्रमाणामध्ये वकिलाची नेमणूक केलेली असून प्रकरण संबंधीत वकिलाचे बिल न.प. कार्यालयास प्राप्त झाले असून (दि. १३/१०/२०२२ व ०७/१०/२०२२) वकिलाची फी व कोर्ट खर्चाची मागणी केली आहे, ती खालील प्रमाणे

| अ.क्र. | याचिका क्र. | वकिलाचे नाव | वकील फी व कोर्ट खर्च |
|---|---|---|---|
| १ | cc/438/2020 | नितीन जाधव | १०,०००/- |
| २ | cc/55/2021 | नितीन जाधव | १०,०००/- |
| ३ | cc/54/2021 | नितीन जाधव | १०,०००/- |
| ४ | wbit petition No - 2462/2022 | ॲड. अभय सांबरे | ३०,०००/- |
| ५ | wbite petition No - 3999/2022 | ॲड. अभय सांबरे | ३०,०००/- |

वरील प्रमाणे अतिरिक्त प्रभारी विधी विभाग न.प. मलकापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार श्री नितीन जाधव व ॲड. अभय सांबरे यांची फी व कोर्ट खर्च प्रदान करणे आवश्यक असल्याचे नमूद केलेले आहे. सदर अहवालाचे अवलोकन करण्यात आले असून त्यानुसार श्री नितीन जाधव व ॲड. अभय सांबरे यांची फी व कोर्ट खर्च प्रदान करण्याचे बाकी असल्याचे मा. मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

वरील सर्व बाबींचा विचार करता श्री नितीन जाधव व ॲड. अभय सांबरे यांची फी व कोर्ट खर्च व केलेल्या कार्यवाहीस न.प. निधीतून प्रदान करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.७ :- जिल्हा प्रशासन अधिकारी यांच्या पदोन्नतीच्या आदेशा नुसार केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे बाबत**

जिल्हा प्रशासन अधिकारी यांच्या पदोन्नतीच्या आदेशा नुसार केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे बाबत वरिष्ठ लिपीक अस्थापना विभाग न.प. मलकापूर यांच्या विषयावरील मा. मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.



Scanned by Scanner Go

ठरविण्यात येते की, जिल्हा प्रशासन अधिकारी यांचे आदेश पत्रा नुसार पदोन्नतीचे आदेश देणे गरजेचे असल्याचे वरिष्ठ लिपीक अस्थापना विभाग यांनी सादर केलेल्या अहवालात नमूद केलेले आहे. त्यानुसार मा. जिल्हा प्रशासन अधिकारी, बुलढाणा यांचेकडे न.प. मलकापूर चे पत्र क्र न.प.म./मुअ/आस्था.वि./२४५/२०२१ दि. १९/०३/२०२१ ला वर्ग ४ मधून कनिष्ठ लिपीक व कनिष्ठ लिपीक पदावरून वरिष्ठ लिपीक पदावर पदोन्नती बाबत प्रस्ताव पाठविण्यात आले असता जिल्हा प्रशासन अधिकारी यांचे आदेश पत्र क्र काविं/न.वि.शा./डे-४/१८९०, दि. ०८/०९/२०२२. द्वारे मंजुरात देण्यात आलेली आहे. सदरची पदोन्नती ही मा. न्यायालयात दाखल याचिकांच्या निकालाच्या अधीन राहून मंजूर करण्यात आलेल्या असून न्यायालयाचे आदेश सर्व संबंधितांना बंधनकारक राहील तसेच याबाबत कोणतीही पूर्वसूचना न देता कारवाई करण्यास सूचित केले आहे. याबाबत कोणताही दावा ऐकून घेतला जाणार नाही. नियमित पदोन्नतीचा व आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती व सेवाविषयक बाबी दस्तऐवजामध्ये त्रुटी निदर्शनास आल्यास तसेच पदोन्नती समितीस माहिती खोटी अथवा चुकीची आहे असे निदर्शनास आल्यास संबंधित कर्मचारी यांना पुन्हा मूळ पदावर ठेवण्यात येईल व त्यांचेकडून अतिप्रदानीत रक्कम वसूल करण्यात येईल. या अटींवर सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे.

यामध्ये वर्ग ४ मधून कनिष्ठ लिपीक पदावर १)श्री पुरुषोत्तम पी. देशपांडे, झिराकुली - खुला प्रवर्ग २) म. इसमाइल नूरमहंमद, शिपाई - खुला प्रवर्ग ३) श्री संतोष पं. पाटील वार्डप्युन - खुला प्रवर्ग ४) उज्वलसिंह भा. राजपूत, कंडक्टर - खुला प्रवर्ग ५)विजय मुरलीधर ठाकूर, वार्डबॉय - खुला प्रवर्ग असे पाच कनिष्ठ पदावर व वरिष्ठ पदावर १) श्री मिलिंद ग. कंडारकर क. लिपीक - खुला प्रवर्ग २) श्री भरत गो. जस्वानी, क. लिपीक - खुला प्रवर्ग ३) श्री हनुमानसिंह क. राजपूत क. लिपीक - खुला प्रवर्ग ४) श्री जयराज एच. देशमुख क. लिपीक - खुला प्रवर्ग ५) श्री सचिन ब. फिरके, क. लिपीक - खुला प्रवर्ग या कर्मचाऱ्यांची निवड झाली असून पदोन्नती समिती बुलढाणा यांनी निवड झालेल्यांना मान्यता दिल्याचे वरिष्ठ लिपीक अस्थापना विभाग यांनी अहवालात नमूद केलेले आहे. त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता जिल्हा प्रशासन अधिकारी यांचे आदेशानुसार पदोन्नतीचे आदेश देण्याच्या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.८ :- आतीया तबस्सुन महंमद अनिस (शिक्षण सेवक) यांना नियमित शिक्षकाची नियुक्ती देणेबाबत**



Scanned by Scanner Go

आतीया तबस्सुन महंमद अनिस (शिक्षण सेवक) यांना नियमित शिक्षकाची नियुक्ती देणेबावत प्र. प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग न.प. मलकापूर यांच्या विषयावरील मा. मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृंत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, आतीया तबस्सुन महंमद अनिस (शिक्षण सेवक) यांना न.प. प्राथमिक शिक्षण विभाग अंतर्गत उर्दू माध्यम शाळेत नियमित शिक्षकाची नियुक्ती देणे असल्याचे प्र. प्रशासन अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालात नमूद केलेला आहे. त्यानुसार न.प. प्राथमिक शिक्षण उर्दू माध्यम शाळेत पवित्र प्रणाली मार्फत आतीया तबस्सुन महंमद अनिस यांना शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती देण्यात आलेली असून त्यांचे नियुक्तीपासून दि १२/०९/२०२२ ला सेवेचे तीन वर्ष पूर्ण झालेले आहेत. त्यानुसार शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र एसएसएन१०९९(३४०/९९)/माशी-२ दि. १३/१०/२००० नुसार शिक्षण सेवकाला सेवेत सामावून घेणेबावत जोडपत्र अ सहपत्रातील अ.क्र. ८ नुसार शिक्षण सेवक या पदावर ३ शैक्षणिक वर्ष अर्थात ३० महिने समाधानकारक काम केल्यानंतर संबंधित उमेदवाराची शिक्षकाच्या नियमित पदावर नियमित वेतनश्रेणी नियुक्ती करण्यात यावी तसेच परिच्छेद १२ ला अधीन राहून नियुक्ती करण्यात यावी असे नमूद केलेले आहे. तसेच न.प. उर्दू प्राथमिक शाळा क्र २ चे मुख्याध्यापक यांच्या अहवालानुसार सदर कर्मचाऱ्याचे ३ वर्षाचे शैक्षणिक कार्य समाधानकारक असून तीनही वर्षाच्या वर्गाचा निकाल १००% आहे व तीन वर्षाचे कार्यमुल्यांकन अहवाल चांगले आहे. त्यानुसार मा. मुख्याधिकारी यांनी सदर बाव सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता आतीया तबस्सुन महंमद अनिस (शिक्षण सेवक) यांना नियमित शिक्षकाची नियुक्ती मा. शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग यांचे मान्यतेस अधीन राहून देण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र. ९ :- सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतूकीचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ नोव्हेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणे बाबत.**

सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतूकीचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ नोव्हेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे



Scanned by Scanner Go

कंत्राटदारास मुदतवाढ देण्याबाबतच्या विषयाची मा. मुखाधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली

ठरविण्यात येते कि, घनकचरा संकलनाचे कामाकरिता सन २०२२-२३ साठीचे अंदाजपत्रकास दि २९/०८/२०२२ रोजी तांत्रिक मंजुरात मिळाली असून सदर कामाचा खर्च १५ व्या वित्त आयोग अंतर्गत प्राप्त अनुदानातून करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी महोदय यांचेकडून प्रशासकीय मंजुरात घेणे, निवीदा प्रक्रिया राबवून कार्यादेश देणे इ. कामांना किमान एक महिना वेळ लागणे अपेक्षित असून सदर काम सुरु ठेवणे, शहरात स्वच्छता ठेवणे अत्यावश्यक असल्यामुळे नवीन निवीदा प्रकिया पूर्ण होऊन कार्यारंभ आदेश होईपर्यंत अथवा जास्तीत जास्त एक महिना सदर कामास १५ व्या वित्त आयोग अंतर्गत मुदत वाढ देणे आवश्यक आहे करिता सदर मुदतवाढ देऊन सदर मुदतवाढीच्या कालावधीतील या कामाचा खर्च १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करण्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घावी लागेल. त्यानुसार सदर कामाचे सन २०२१-२२ चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राईजेस, गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तीना अधीन राहून दिनांक १ नोव्हेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत १ महिना मुदतवाढ देणे आवश्यक असल्याचे आरोग्य निरीक्षक, न.प. मलकापूर यांनी अहवालाद्वारे सभेच्या निदर्शनास आणून दिले आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करिता आरोग्य निरीक्षक यांनी अहवालात नमूद केल्यानुसार सदर कामास सन २०२१-२२ चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राईजेस, गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तीना अधीन राहून दिनांक १ नोव्हेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत १ महिना मुदतवाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

विषय क्र. १० :- **सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा प्रक्रियेचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ नोव्हेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास दिलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणे बाबत.**

सन २०२१-२२ मध्ये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा प्रक्रियेचे कामास २०२२-२०२३ करिता दिनांक १ नोव्हेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत सन २०२१-२२ चे कंत्राटदारास मुदतवाढ देण्याबाबतच्या विषयाची मा. मुखाधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली

ठरविण्यात येते कि, घनकचरा प्रक्रियेचे कामाकरिता सन २०२२-२३ साठीचे अंदाजपत्रकास दि २९/०८/२०२२ रोजी तांत्रिक मंजुरात मिळाली असून सदर कामाचा खर्च १५ व्या वित्त आयोग



Scanned by Scanner Go

अंतर्गत प्राप्त अनुदानातून करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी महोदय यांचेकडून प्रशासकीय मंजुरात घेणे, निवीदा प्रक्रिया राबवून कार्यादेश देणे इ. कामांना किमान एक महिना वेळ लागणे अपेक्षित असून सदर काम सुरु ठेवणे अत्यावश्यक असल्यामुळे नवीन निवीदा प्रकिया पूर्ण होऊन कार्यारंभ आदेश होईपर्यंत अथवा जास्तीत जास्त एक महिना सदर कामास १५ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत मुदत वाढ देणे आवश्यक आहे करिता सदर मुदतवाढ देऊन सदर मुदतवाढीच्या कालावधीतील या कामाचा खर्च १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करण्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घावी लागेल. त्यानुसार सदर कामाचे सन २०२१-२२ चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राईजेस, गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तींना अधीन राहून दिनांक १ नोव्हेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत १ महिना मुदतवाढ देणे आवश्यक असल्याचे आरोग्य निरीक्षक, न.प. मलकापूर यांनी अहवालाद्वारे सभेच्या निदर्शनास आणून दिले आहे.

वरील सर्वबाबींचा विचार करिता आरोग्य निरीक्षक यांनी अहवालात नमूद केल्यानुसार सदर कामास सन २०२१-२२ चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राईजेस, गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तींना अधीन राहून दिनांक १ नोव्हेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत १ महिना मुदतवाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

आर यु सुरडकर
प्रशासक
नगरपरिषद मलकापूर



Scanned by Scanner Go